इटलीच्या पंतप्रधानपदी जॉर्जिया मेलोनी

रोम : जॉर्जिया मेलोनी शनिवारी इटलीच्या पंतप्रधान म्हणून शपथ घेणार आहेत. त्यांनी शुक्रवारी राष्ट्राध्यक्षांकडे सरकार स्थापनेचा दावा केला. अतिउजव्या विचारांचा पक्ष दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच इटलीमध्ये सत्तेत येत आहे. बेनिटो मुसोलिनी यांच्या फॅसिस्ट पक्षात पाळेमुळे असलेल्या 'ब्रदर्स ऑफ इटली' पक्षाच्या नेत्या मेलोनी यांनी सहयोगी पक्षांशी वाटाघाटी पूर्ण झाल्या असून सरकार बनवण्यास सिद्ध असल्याचे जाहीर केले. त्यानंतर राष्ट्राध्यक्ष प्रासादातून मेलोनी आणि अन्य मंत्र्यांच्या शपथविधीची घोषणा करण्यात आली.

'अग्नी प्राईम'ची चाचणी यशस्वी

बालासोर : भारताने शुक्रवारी ओडिशाच्या किनारपट्टीवर स्वदेशी बनावटीच्या मध्यम पल्ल्याचे 'बॅलिस्टिक' क्षेपणास्त्र 'अग्नी प्राईम'ची यशस्वी चाचणी घेतली. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (डीआरडीओ) सूत्रांनी ही माहिती दिली. ए.पी.जे. अब्दुल कलाम बेटावरून सकाळी पावणे दहाला हे क्षेपणास्त्र प्रक्षेपित करण्यात आले. घन इंधन असलेल्या या क्षेपणास्त्राने सर्व निर्धारित मापदंड यशस्वीरीत्या पूर्ण केले. हे क्षेपणास्त्र एक ते दोन हजार किलोमीटरपर्यंतच्या लक्ष्यावर मारा करू शकते.

जिनपिंग यांच्या फेरनिवडीवर आज शिक्कामोर्तब ?

बीजिंग : चीनमधील सत्ताधारी कम्युनिस्ट पार्टीच्या पंचवार्षिक अधिवेशनाचा उद्या, शनिवारी अखेरचा दिवस आहे. यावेळी पक्षाचे सर्वोच्च नेते म्हणून क्षी जिनपिंग यांना तिसरा कार्यकाळ बहाल करण्यात येईल, असे समजते. अखेरच्या दिवशी मध्यवर्ती समितीची निवडही केली जाईल.

काशी, उज्जैन, अयोध्येला पुनर्वैभव -मोदी

पीटीआय, डेहराडून



''गुलामगिरीच्या मानसिकतेमुळे अनेक दशकांपासून दुर्लक्षित राहिलेल्या काशी, उज्जैन, अयोध्येसह अनेक श्रद्धास्थानांना आता पुनर्वैभव मिळत आहे. केदारनाथ, बद्रीनाथ व हेमकुंड साहिब या तीर्थक्षेत्रांनाही सोयीसुविधांद्वारे जोडले जात आहे,'' अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी दिली. बद्रीनाथ धामपासून तीन किलोमीटरवर असलेल्या माणा गावात जाहीर सभेत मोदी बोलत होते.

ते म्हणाले, की अयोध्येतील भव्य राम मंदिरापासून विंध्याचल देवीच्या मार्गिकेपर्यंत (कॉरिडोर) सोयी-सुविधांच्या उभारणीद्वारे भारताच्या सांस्कृतिक उन्नतीची उद्घोषणा करत आहे. प्रत्येक भक्ताला या श्रद्धास्थानांपर्यंत पोहोचणे आता सोपे जात आहे. स्वातंत्र्यानंतरही गुलामगिरीच्या मानसिकतेत देशाला जखडून ठेवले गेले होते. पूर्वीच्या सरकारांनी आपल्या संस्कृतीबद्दल नाहक असलेल्या न्यूनगंडामुळे या श्रद्धास्थानांचा विकास केला नाही. या मानसिकतेने श्रद्धास्थानांची दयनीय अवस्था झाली होती. शेकडो वर्षांपासून ऊन-पाऊस, प्रतिकूल हवामानामुळे येथील मार्ग खराब झाले आहेत. मात्र, आधीच्या सरकारांना भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची गरजही वाटली नाही.

'पर्वतमाला'चा विकास!

या वेळी मोदींनी सांगितले, की पर्वतीय राज्यांचा संपर्क वाढवण्यासाठी आता 'सागरमाला' व 'भारतमाला'च्या धर्तीवर 'पर्वतमाला'चे काम केले जाईल. या अंतर्गत उत्तराखंड आणि हिमाचलमध्ये रज्जुमार्गांचे मोठे जाळे तयार करणे सुरू झाले आहे. सीमावर्ती गावांच्या विकासाचा उल्लेख करून ते म्हणाले, की तेथे असा विकास झाला पाहिजे, की हे गाव सोडून गेलेल्यांना तेथे परतावेसे वाटले पाहिजे.

केदारनाथ-बद्रिनाथाचे दर्शन

डेहराडून : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी उत्तराखंडातील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ मंदिराच्या दर्शनानंतर चमोलीतील बद्रिनाथ धाम येथे भगवान विष्णूची पूजा केली. आपल्या दोन दिवसीय उत्तराखंड दौऱ्यात मोदी विविध विकास प्रकल्पांचा आढावा घेणार आहेत. नवीन प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. [illegible] पर्वतांच्या मध्ये असलेल्या विष्णू मंदिरात [illegible] पुजाऱ्यांकडून [illegible] स्वागत केले.

इम्रान खान पाच वर्षांसाठी अपात्र

पीटीआय, इस्लामाबाद

पाकिस्तानच्या निवडणूक आयोगाने शुक्रवारी माजी पंतप्रधान इम्रान खान यांना देशाच्या भांडारातील (तोशाखाना) भेटवस्तू विक्रीतून मिळालेले उत्पन्न दडवल्याप्रकरणी पाच वर्षांसाठी अपात्र ठरवले. या काळात इम्रान खान यांना कोणत्याही सार्वजनिक पदाची जबाबदारी घेता येणार नाही.

खान यांच्यावर विदेशी नेत्यांकडून मिळालेल्या भेटवस्तूंच्या विक्रीतून मिळालेली रक्कम उघड न केल्याचा आरोप होता. यामुळे पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफचे (पीटीआय) प्रमुख असलेले ७० वर्षीय इम्रान खान पाच वर्षांसाठी पाकिस्तानच्या 'पार्लमेंट'चे सदस्य होऊ शकत नाहीत. ऑगस्टमध्ये सत्ताधारी आघाडीच्या खासदारांनी खान यांच्याविरोधात पाकिस्तानच्या निवडणूक आयोगाकडे याप्रकरणी तक्रार केली होती.

'करड्या यादी'तून पाकिस्तान बाहेर

नवी दिल्ली : दहशतवादी कारवायांना होणाऱ्या अर्थपुरवठ्यावर लक्ष ठेवणाऱ्या 'आर्थिक कृतीदला'ने (फायनान्शियल अ‍ॅक्शन टास्क फोर्स - एफएटीएफ) करड्या यादीतून (ग्रे लिस्ट) पाकिस्तानचे नाव वगळले आहे. त्याच वेळी लष्करी राजवट असलेल्या म्यानमारला प्रथमच काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

पॅरिसमध्ये एफएटीएफची दोन दिवसांची परिषद झाली. त्यानंतर जारी केलेल्या पत्रकात एफएटीएफने म्हटले आहे की, पाकिस्तानने अफरातफर आणि दहशतवादासाठीचा अर्थपुरवठा रोखण्यामध्ये प्रगती केल्याचे दिसते. जून २०१८ आणि जून २०२१मध्ये आढळून आलेल्या अनेक त्रुटी पाकिस्तानने दूर केल्याचे यात नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तानने दहशतवादविरोधी आर्थिक यंत्रणा अधिक सुधारावी, असेही संस्थेने सूचित केले आहे.

ब्रिटनच्या पंतप्रधानपदासाठी जॉन्सन, सुनक यांचे प्रयत्न

लंडन : ब्रिटनच्या पंतप्रधान लिझ ट्रस यांनी गुरुवारी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर या पदासाठी माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्यासह काही इच्छुक 'पार्लमेंट' सदस्यांनी पाठिंबा मिळवण्यासाठीची मोहीम गतिमान केली. आपल्या ४५ दिवसांच्या कारकीर्दीत करकपातीसारख्या वादग्रस्त निर्णयामुळे ट्रस यांनी राजीनामा दिला.

आता सत्ताधारी कॉन्झर्वेटिव्ह पक्ष पंतप्रधानपदाच्या उमेदवारासाठी निवडणूक घेणार आहे. आठवडाभरात ही निवड केली जाईल. जॉन्सन यांच्यासह ब्रिटनचे माजी अर्थमंत्री व पक्षांतर्गत निवडणुकीत ट्रस यांच्याकडून हार पत्करावे लागलेले पंतप्रधानपदासाठीचे उमेदवार ऋषी सुनक आणि 'हाउस ऑफ कॉमन्स'च्या नेत्या पेनी मॉर्डाट यांना सट्टेबाजांनी पसंती दिली आहे.

अनेक वादांमुळे जॉन्सन यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला होता. नवीन नेत्यासाठी उमेदवारी नामांकन प्रक्रिया सोमवारी दुपारी बंद होईल.

ज्ञानवापी तळघर : २ नोव्हेंबरला सुनावणी

वाराणसी : ज्ञानवापी मशिदीच्या परिसरात असलेल्या तळघरांच्या सर्वेक्षणाबाबत हिंदू पक्षकारांनी केलेल्या याचिकेवर २ नोव्हेंबरपासून सुनावणी होणार आहे. या याचिकेवर वेळेत उत्तर न दिल्याने मशीद समितीला दंडही ठोठावण्यात आला आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी पुणे

- जाहीर निवेदन -

1. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे पेठ क्र. 12 (भोसरी) येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS व LIG गृहप्रकल्प.

* अल्प उत्पन्न गट (LIG)
सदनिकेचे चटई क्षेत्र - 59.27 चौ.मी.
सदनिकेची विक्री किंमत - 32.00 लाख
एकूण उपलब्ध सदनिका - 793

* आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS)
सदनिकेचे चटई क्षेत्र - 29.55 चौ.मी.
सदनिकेची विक्री किंमत - रु. 7,40,000/-
(वरील केलेली किंमत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा वगळून आहे.)
एकूण उपलब्ध सदनिका - 31

● सदनिकांचे आरक्षण

अ.क्र.	वर्गवारी	अल्प उत्पन्न गटाकरिता (LIG) उपलब्ध सदनिका	आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरिता (EWS) उपलब्ध सदनिका
1	सर्वसाधारण (GP)	581	0
2	अनुसूचित जाती (SC)	27	0
3	अनुसूचित जमाती (ST)	82	29
4	विमुक्त जाती (NT)	2	0
5	भटक्या जमाती (DT)	42	2
6	दिव्यांग	59	0

2. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे पेठ क्र. 30-32 (वाल्हेकरवाडी, चिंचवड) येथे परवडणारी घरे अंतर्गत EWS (1RK) व LIG (1 BHK) गृहप्रकल्प.

* अल्प उत्पन्न गट LIG (1 BHK)
सदनिकेचे चटई क्षेत्र - 34.57 चौ.मी.
सदनिकेची विक्री किंमत - रु. 25,47,809/-
एकूण उपलब्ध सदनिका - 414

* आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक EWS (1RK)
सदनिकेचे चटई क्षेत्र - 25.52 चौ.मी.
सदनिकेची विक्री किंमत - रु. 18,80,824/-
एकूण उपलब्ध सदनिका - 366

● सदनिकांचे आरक्षण

अ.क्र.	वर्गवारी	अल्प उत्पन्न गटाकरिता (LIG) (1BHK) उपलब्ध सदनिका	आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरिता (EWS)(1RK) उपलब्ध सदनिका
1	सर्वसाधारण (GP)	310	270
2	अनुसूचित जाती (SC)	46	42
3	अनुसूचित जमाती (ST)	25	23
4	विमुक्त जाती (NT)	6	6
5	भटक्या जमाती (DT)	6	6
6	दिव्यांग	21	19

ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे जुने कार्यालय, सेक्टर 24, लोकमान्य टिळक चौक, निगडी येथे Help Desk ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

पेठ क्र. 12 व पेठ क्र. 30-32 येथील सदनिकांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदतवाढ दि. 18/10/2022 पर्यंत होती परंतु नागरिकांच्या विनंतीवरून ही मुदतवाढ दि. 03/11/2022 पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत इच्छुक नागरिकांना ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अर्जदारांना अर्ज करण्याकरिता शेवटची संधी उपलब्ध करून दिली असून त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.

पेठ क्र. 12 व पेठ क्र. 30-32 येथील सदनिकांसाठी पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे, भूखंडाची माहिती, प्रकल्पातील सोयी सुविधा, सोडतीच्या वेळापत्रकाशी संबंधित माहिती www.pmrda.gov.in अथवा https://lottery.pmrda.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Helpline No. - 02262531727

सही/- बन्सी गवळी
अतिरिक्त आयुक्त
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नझारा टेक्नॉलॉजीस लिमिटेड

CIN: L72900MH1999PLC122970
नोंदणीकृत कार्यालय: ५१-५४, मेकर चेंबर्स ३, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.
दूरध्वनी: +९१-२२-४०३३०८००, फॅक्स: +९१-२२-२२८१०६०५, ईमेल: info@nazara.com, संकेतस्थळ: www.nazara.com

३० सप्टेंबर, २०२२ रोजी समाप्त तिमाही आणि अर्ध वर्ष करिता नझारा टेक्नॉलॉजीस लिमिटेडच्या अलेखापरीक्षित एकत्रिकृत आणि स्वतंत्र वित्तिय विवरणांचे सारांश

(रु. दशलक्षामध्ये)

अ. क्र.	तपशील	एकत्रिकृत						स्वतंत्र					
		तिमाही अखेर			अर्ध वर्ष अखेर		वर्ष अखेर	तिमाही अखेर			अर्ध वर्ष अखेर		वर्ष अखेर
		३०.०९.२०२२	३०.०६.२०२२	३०.०९.२०२१	३०.०९.२०२२	३०.०९.२०२१	३१.०३.२०२२	३०.०९.२०२२	३०.०६.२०२२	३०.०९.२०२१	३०.०९.२०२२	३०.०९.२०२१	३१.०३.२०२२
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१	प्रवर्तनामधून एकूण उत्पन्न	२,८७०	२,२९७	१,३४२	५,१६७	२,७९३	६,२७८	१६१	८७	७३	२४६	१६२	३३०
२	कर पश्चात सदर कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी पूर्व*)	२५७	२२७	१५७	४८४	३६३	७०४	(१२३)	१	(१०२)	(१२२)	(११९)	(३४६)
३	कर पश्चात सदर कालावधीसाठी कर पूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबी पश्चात*)	१७४	१६५	११३	३३९	२८८	५०७	(१४६)	५	(७१)	(१४१)	(१२७)	(३३८)
४	सदर कालावधीसाठी सर्वसमावेशक उत्पन्न (सदर कालावधीसाठी नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात)	२४२	२२६	१२६	४६८	३०१	५०७	(१४५)	३	(८१)	(१४३)	(१२९)	(३४०)
५	समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. ४/- प्रती शेअर)	२६३	२६३	१२२	२६३	१२२	१३०	२६३	२६३	१२२	२६३	१२२	१३०
६	मागील वर्षासाठी लेखापरीक्षित ताळेबंद पत्रकामध्ये दाखविल्यानुसार (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) राखीव						१०,२८३						८,८५७
७	प्रती भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. ४/-) (अखंडीत आणि खंडीत प्रवर्तनांसाठी)												
	मूलभूत (रु. मध्ये) :	१.५५	१.७६	१.७१	३.३१	३.५८	४.५५	(२.२३)	०.०८	(१.३०)	(२.१५)	(२.०१)	(५.४०)
	सौम्यीकृत (रु. मध्ये) :	१.५५	१.७५	१.७१	३.३०	३.५८	४.५५	(२.२३)	०.०८	(१.३०)	(२.१५)	(२.०१)	(५.४०)

* लागू असलेल्या इंड-एएस नियम / एएस नियम अनुसार नफा - तोटा पत्रकामध्ये असाधारण आणि अपवादात्मक बाबी समायोजित करण्यात आल्या.

टीप:
१. उपरोल्लेखित हे सेबी (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटन विनियम) विनियम, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे सादर केलेल्या तिमाही आणि अर्ध वर्ष अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचे सारांश आहे. तिमाही/वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज संकेतस्थळ www.bseindia.com, www.nseindia.com कंपनीच्या संकेतस्थळ www.nazara.com वर उपलब्ध आहे.
२. वरील वित्तीय निष्कर्षांचे लेखा समितीने पुनरावलोकन केले आणि शिफारस केली आणि ऑक्टोबर २०, २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मंजुरी दिली.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
नझारा टेक्नॉलॉजीस लिमिटेड करिता
सही/-
नितीश मित्तरसैन
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०२३४७४३४

स्थळ : मुंबई
दिनांक : २०-१०-२०२२

Adfactors 323

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३० सप्टेंबर २०२२ रोजी संपलेल्या तिमाही व सहामाहीकरीता अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर,२०२२ अलेखापरिक्षित	संपलेली तिमाही ३० जून,२०२२ अलेखापरिक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर,२०२१ अलेखापरिक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर,२०२२ अलेखापरिक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर,२०२१ अलेखापरिक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च,२०२२ लेखापरिक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	२,७६१	२,१९०	१,७१४	४,९५१	३,६४१	७,६०२
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व /किंवा असाधारण बाबींपूर्वी)	१,३४०	९५०	६०९	२,२९०	१,३००	२,६३४
३. कालावधीकरिता करपूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	१,३४०	९५०	६०९	२,२९०	१,३००	२,६३४
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	१,३४०	९५०	६०३	२,२९०	१,२९४	२,६२६
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	१,३३८	९६०	५९६	२,२९८	१,२४१	२,७७५
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्यालेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(१३,६८२)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.५६	०.४०	०.२५	०.९६	०.५४	१.०९
सौम्यिकृत (₹)	०.५६	०.४०	०.२५	०.९६	०.५४	१.०९

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

नोंद:
१. वरील तक्ता त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या लेखापरीक्षा समितीच्या सभेत केले गेले आहे आणि संचालक मंडळाकडून त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२२

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्धवर्षाचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

तपशील	संपलेले तिमाही	संपलेले अर्ध वर्ष	संपलेले तिमाही
	३० सप्टेंबर, २०२२	३० सप्टेंबर, २०२२	३० सप्टेंबर, २०२१
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	२,५२,७५०	४,९६,७७९	१,९१,७३२
वजा: वसूल केलेला जीएसटी	२०,५२७	४०,५०३	१६,४२८
प्रवर्तनातून महसूल	**२,३२,८६३**	**४,५५,१७६**	**१,७४,१०४**
असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा	२०,२०९	४४,६११	१९,३२४
करपूर्व नफा	२०,२०९	४४,६११	१९,३२४
कालावधीसाठी नफा*	१५,५१२	३४,५११	१५,४७९
एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)*	५,९१४	१८,८८३	२९,५५९
भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/- मूल्याचा	६,७६६	६,७६६	६,४४५
पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी**	-	-	-
प्रति इक्विटी समभाग मिळकत (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी) (वार्षिकीकृत नाही)			
मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात	२०.७८	४५.०२	२०.८८
मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व	२०.७८	४५.०२	२०.८८
सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात	२०.७८	४५.०२	२०.६०
सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व	२०.७८	४५.०२	२०.६०

*नियंत्रण विरहित स्वारस्य सोडून समाविष्ट
**३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹७,७२,७२० कोटी.

टिपा:
१. २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रकाशित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.
२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

तपशील	संपलेले तिमाही	संपलेले अर्ध वर्ष	संपलेले तिमाही
	३० सप्टेंबर, २०२२	३० सप्टेंबर, २०२२	३० सप्टेंबर, २०२१
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	१,४६,३७०	३,०४,०२६	१,०८,३५०
वजा: वसूल केलेला जीएसटी	५,९९२	१२,३२५	५,३३२
प्रवर्तनातून महसूल	**१,४०,३७८**	**२,९१,७०१**	**१,०३,०१८**
असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा	९,०७२	२९,४६७	१०,९४४
करपूर्व नफा	९,०७२	२९,४६७	१०,९४४
कालावधीसाठी नफा	६,९९५	२२,०११	९,२२८
एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)	४,४९३	१४,१४१	१०,०२०

३. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशीलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुसार स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्याचा संक्षिप्त गोषवारा आहेत.
३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशीलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट्स (www.bseindia.com / www.nseindia.com) आणि कंपनीच्या वेबसाईटवर www.ril.com येथे उपलब्ध आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२२

www.ril.com